महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!



महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २२ वे दिनांक : १०/०१/२०२६ वार : शनिवार


## १९५२ साली जन्माला आलेल्या पक्षाला आज पोरं भाड्याने घ्यावी लागताय : राज ठाकरे



**नाशिक :** महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार सुरू केला आहे. या महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी युती केली आहे. आज नाशिक येथील अनंत कान्हेरे मैदानावर उभय नेत्यांची संयुक्त सभा पार पडत आहे.

राज ठाकरेंनी बाळासाहेब ठाकरेंच्या स्टाइलमध्ये भाषणाची सुरुवात केली, तेव्हा एकच जल्लोष पाहायला मिळाला. राज ठाकरे म्हणाले, आज अनेक वर्ष रखडलेल्या याची कारने कोणालाही देता येणार नाहीत, कारण काळलीच नाहीत. चार वर्षांपूर्वी मुदत संपून देखील या निवडणुका का होत नव्हत्या याचे उत्तर या सरकारने दिले पाहिजे. आता या निवडणुका होत आहेत, आणि ज्या पद्धतीने हा सगळा प्रकार सुरू आहे. इतका चुकीचा कॅरम फुटला की कोणाच्या सोंगट्या कोणाच्या भोकात आहे तेच समजत नाही. प्रत्येकाला विचारावे लागते, आज कुठे?, असा खरमरीत टोला लगावला.

हे कोणत्या निवडणुका सुरू आहेत महाराष्ट्रात? २०१२ साली जेव्हा इथे माझी सत्ता आली. २०१७ साली इथे फडणवीस आले आणि म्हणाले नाशिक दत्तक घेतो. त्या सगळ्या गोष्टींना नाशिककर भुलले आणि आम्ही केलेली कामे विसरले. दत्तक घेतल्यानंतर हा माणूस नंतर फिरकलाच नाही. २०१२ ला जेव्हा आम्ही सत्तेत आलो तेव्हा सुद्धा कुंभमेळा झाला आणि यशस्वीपणे झाला. त्यावेळी सगळ्यांना बरोबर घेतले होते आणि एकही झाड कापले गेले नव्हते. मग आज का कापले जात आहे? राज ठाकरे म्हणाले, अर्ज छाननीच्या वेळेला मला समजले की एकाने एकाचा एबी फॉर्म गिळून टाकला. कोणत्या थराला गेल्या आहेत निवडणुका? आज या महाराष्ट्रात ६०-७० उमेदवार सत्ताधारी पक्षाचे बिनविरोध निवडून येतात. म्हणजे तिथल्या लोकांना मतदानाचा अधिकारही देणार नाही तुम्ही. दहशत निर्माण करायची आणि अशा वातावरणात निवडणुका घेतल्या जात आहेत. जुनी काम करणारी माणसं होती न या पक्षाकडे? म्हणजे १९५२ साली जन्माला आलेल्या पक्षाला आज २०२६ ला पोरं भाड्याने घ्यावी लागत आहेत. याचे कारण जो पक्षात इथे काम करत आहे त्याला शून्य किंमत. जी पोरं आणली जात आहेत, ती काही सुखाने येत नाहीयेत, पैसे देऊन आणले जात आहेत.


## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-


## इम्तियाज जलील भाजपचे हस्तक : अंबादास दानवें



**छत्रपती संभाजीनगर :** मध्ये महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण आधीच तापलेले असताना, एमआयएमचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या वाहनावर झालेल्या हल्ल्यामुळे परिस्थिती आणखी चिघळली आहे. काही दिवसांपूर्वी घडलेल्या या घटनेनंतर जलील यांनी थेट पोलिसांकडे तक्रार करत हा हल्ला झाला आहे आणि आता पोलिस काय कारवाई करतात ते पाहू, अशी प्रतिक्रिया दिली. इतकेच नव्हे तर, या हल्ल्यामागे गुंडांना पालकमंत्री संजय शिरसाट आणि मंत्री अतुल सावे यांचे पाठबळ असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. या आरोपांमुळे शहरातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, निवडणुकीच्या तोंडावर आरोप-प्रत्यारोपांच्या फेऱ्या वाढताना दिसत आहेत.

या पार्श्वभूमीवर आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी इम्तियाज जलील यांच्यावर जोरदार टीका केली आहे. दानवे यांनी जलील यांना थेट भाजपचा हस्तक ठरवत, छत्रपती संभाजीनगर शहराला त्यांनी व्यसनाधीनतेकडे ढकलल्याचा आरोप केला. काळे धंदे करणारा व्यक्ती पैशाच्या जोरावर आणि सत्ताधाऱ्यांच्या संरक्षणाखाली निवडून येतो, अशी घणाघाती टीका करत दानवे यांनी जलील यांच्यावर गंभीर आरोपांची सरबत्ती केली. आमची लढत इम्तियाज जलील यांच्याशी नाही, तर थेट भाजप आणि शिंदे गटाशी आहे, असे स्पष्ट करत त्यांनी एमआयएमसोबत कोणतीही राजकीय लढाई नसल्याचेही सांगितले.

अंबादास दानवे पुढे म्हणाले की, शिंदे गटामध्येच सध्या अंतर्गत संघर्ष सुरू आहे. एकमेकांविरोधात आव्हाने उभी राहत असून, त्यांच्यातच ताणतणाव वाढले आहेत. त्यामुळे शहरातील राजकारणात खरी लढत कुणामध्ये आहे, हे जनतेला स्पष्टपणे दिसत असल्याचा दावा त्यांनी केला. इम्तियाज जलील यांच्या वाहनावरील हल्ल्याच्या मुद्द्यावरून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा अप्रत्यक्ष आरोप करत, हे सगळे सत्ताधाऱ्यांचे राजकीय खेळ असल्याचे संकेत दानवेंनी दिले. निवडणुकीच्या तोंडावर अशा घटनांमधून वातावरण ढवळून काढण्याचा प्रयत्न होत असल्याचेही त्यांनी सूचित केले.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावरूनही अंबादास दानवे यांनी तीव्र शब्दांत टीका केली. काल फडणवीसांचा दौरा म्हणजे टॉक शो नव्हता, तो थेट ‘फेक शो’ होता, असा टोला त्यांनी लगावला. शहराच्या प्रश्नांवर बोलण्याऐवजी मुख्यमंत्री केवळ नेहमीची स्क्रिप्ट वाचून गेले, असा आरोप त्यांनी केला. ते ज्या शहरात जातात तिथे फक्त शहराचं नाव बदलतं, बाकी भाषण मात्र तसंच असतं, अशी उपरोधिक टीका करत, भाजप सभेला सामोरे जाण्याऐवजी पळ काढत असल्याचा आरोप दानवेंनी केला. त्यांच्या मते, भाजपने जाणीवपूर्वक जाहीर सभा न घेता टॉक शोचा मार्ग स्वीकारला.

समृद्धी महामार्गाच्या जमिनींच्या मुद्द्यावरूनही दानवे यांनी मुख्यमंत्र्यांना प्रत्युत्तर दिले. आम्ही अडथळा आणला नसता, तर शेतकऱ्यांच्या जमिनी लुटल्या गेल्या असत्या, असा दावा करत, शिवसेना ठाकरे गटामुळेच शेतकऱ्यांना पाचपट दर मिळाल्याचे त्यांनी सांगितले. आमचा जमिनी देण्याला विरोध नव्हता, मात्र दर अन्यायकारक असल्यामुळे आम्ही विरोध केला, असे स्पष्ट करत, उद्धव ठाकरे शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून मैदानात उतरल्याचेही त्यांनी ठामपणे मांडले. त्यामुळे फडणवीसांनी आमच्यावर आरोप करण्याऐवजी स्वतःची भूमिका तपासावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

छत्रपती संभाजीनगरच्या पाणीपुरवठ्याच्या गंभीर समस्येवरही अंबादास दानवे यांनी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले. शहराला वर्षातील ३६५ दिवसांपैकी अवघे ४४ दिवस पाणी मिळते, असा आरोप करत त्यांनी आकडेवारी मांडली. सध्या शहराला १४० एमएलडी पाणी मिळत असताना, गरज मात्र २४० एमएलडीची असल्याचे त्यांनी सांगितले. देवेंद्र फडणवीस यांनी फक्त तारखा दिल्या, प्रत्यक्षात पाणी मात्र अजून दिलेले नाही, असा आरोप करत ‘लबाडांनो पाणी द्या’ म्हणत आंदोलन केल्याची आठवण त्यांनी करून दिली. भाजप अजूनही आश्वासनांच्या पलीकडे गेलेले नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचा प्रचार सध्या जोरात सुरू असल्याचे दानवे यांनी सांगितले. दहा तारखेला उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा होणार असून, त्यानंतर प्रचाराचा शेवटचा टप्पा सुरू होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. संपूर्ण प्रचारयंत्रणा रस्त्यावर उतरली असून, संभाजीनगर महापालिकेत पुन्हा एकदा शिवसेनेचेच वर्चस्व प्रस्थापित होईल, असा ठाम विश्वास अंबादास दानवे यांनी व्यक्त केला. सत्ताधाऱ्यांच्या अपयशामुळे जनता आता बदलासाठी तयार असून, आगामी निवडणूक शहराच्या राजकारणाला नवी दिशा देईल, असा विश्वासही त्यांनी शेवटी व्यक्त केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० जानेवारी २०२६


# रा. से. यो. शिबिराअंतर्गत आरोग्य शिबिर संपन्न




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, मुरूम यांच्या वतीने मौजे गणेशनगर येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले. या शिबिराअंतर्गत ग्रामीण रुग्णालय, मुरूम व कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या आरोग्य शिबिरामध्ये उपस्थित स्वयंसेवक व गावातील नागरिकांची सखोल आरोग्य तपासणी करण्यात आली. एकूण ५७ नागरिकांची रक्तगट तपासणी, सीबीसी, एच.बी. एस.ए.जी., एच.आय.व्ही., रक्तदाब (बी.पी.) व साखर (शुगर) यांसह विविध आजारांची तपासणी करून आवश्यक ते उपचार व मार्गदर्शन करण्यात आले.या प्रसंगी कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. गोविंद इंगोले, ग्रामीण रुग्णालय, मुरूम येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरदाळे, डॉ. कांबळे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ विजय भोसले, समुपदेशक सुजित जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. गजानन उपासे, प्रा. प्रसाद इंगोले, प्रा. बालाजी इंगोले, प्रा. रोहन हराळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक जनजागृती कार्यक्रम



**छत्रपती संभाजीनगर :** मा. आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्री.जी. श्रीकांत सर व मा उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख मा.श्री. अंकुश पांढरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर या शाळेने आज दिनांक ०९/०१/२०२६ रोजी नवखंडा कॉलेज येथे मुख्याध्यापक श्री. चौधरी सर यांचे मार्गदर्शन व श्रीमती पंडित अर्चना मॅडम यांनी बसविलेले पथनाट्य सादर करण्यात आले. या वेळी स्विप चे श्री कांबळे सर,श्री बाराबोटे सर, मुख्याध्यापक संजीव सोनार, मुख्याध्यापक श्री कोल्हे सर, मुख्याध्यापक श्री उबाळे सर, श्री संजय कुलकर्णी सर,श्री नाना भिसे, गावित संपूर्ण टीम व श्रीमती मंगल निकम, श्री खिल्लारे सर उपस्थित होते.

# प्रसिध्द व्यापारी प्रविण गर्जे यांच निधन



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड शहरातील प्रसिद्ध शुभम मेडिकल चे मालक प्रवीण साहेबराव गर्जे पाटील (चंदुसेठ) (वय ५७ वर्षे) हे मित्र मंडळी तसेच कुटुंबासोबत जैलसमेर(राजस्थान) येथे पर्यटनासाठी गेले असता शुक्रवारी पहाटे ३:३० च्या सुमारास अचानक छातीत तिव्र कळा सुरू झाल्याने त्यांना सोबत असलेल्या मित्रांनी खाजगी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले. मात्र उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांचे पार्थिव खाजगी वाहनाने कन्नड येथे आणण्यात येत असून शनिवारी दि.१० रोजी सकाळी १०वाजता त्यांचा पार्थिववर देवलोक स्मशान भूमी कन्नड येथे अंत्य संस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात आई,पत्नी, दोन मुले, दोन भाऊ, भावजयी व पुतणे असा परिवार आहे. ते माजी नगर अध्यक्षा सुमतीबाई साहेबराव गर्जे पाटील यांचे चिरंजीव व वैजापूरचे आमदार रमेश पाटील बोरणारे यांचे शालक होत. तसेच सहकार बँकेचे निवृत्त कर्मचारी प्रकाश बापू गर्जे पाटील यांचे ते लहाने बंधू होते. त्यांच्या जाण्याने त्यांच्या पूर्ण गर्जे पाटील परिवारा वरती शोककळा पसरली असून पूर्ण कन्नड शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# विद्यार्थ्यांच्या शंकांना पूर्णविराम; रियाझ शाह सरांच्या मार्गदर्शनाने विज्ञानाचा पेपर होणार आता 'आसान'!



**जळगाव :** येथील इकरा पब्लिक स्कूलमध्ये नुकतेच इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान विषयाचे विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. 'एस.एस.सी. मार्गदर्शन मालिके'चा भाग असलेल्या या सत्रात विज्ञानाचे नामवंत तज्ञ रियाझ शाह यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेत पैकीच्या पैकी गुण मिळवण्याचे महत्त्वपूर्ण मंत्र दिले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला विज्ञान विभाग प्रमुख इश्तियाक अहमद यांनी रियाझ शाह सरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार केला.यावेळी विद्यार्थ्यांमध्ये परीक्षेबद्दल असलेला उत्साह आणि जिद्द स्पष्टपणे दिसून येत होती. रियाझ शाह सरांनी एलसीडी (LCD) प्रेझेंटेशनच्या माध्यमातून विज्ञानातील क्लिष्ट संकल्पना अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगितल्या व उत्तरपत्रिका नेमकी कशी लिहावी, वेळेचे नियोजन कसे करावे आणि आकृत्यांचे महत्त्व यावर त्यांनी विशेष भर दिला.प्रश्नोत्तरांच्या तासात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक शंकांचे सरांनी समाधानकारक निरसन केले. शाह यांनी दैनंदिन जीवनातील रंजक उदाहरणे दिल्याने विद्यार्थी या सत्रात पूर्णपणे मंत्रमुग्ध झाले होते.सत्राच्या शेवटी, उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी आगामी बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचा निकाल उंचावण्याचे वचन दिले. "हे सत्र विद्यार्थ्यांसाठी खरोखरच दिशादर्शक ठरले असून, यामुळे त्यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला आहे," असे मत विज्ञान विभाग प्रमुखांनी व्यक्त केले.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103

E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईंडींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० जानेवारी २०२६


## मुरूम पालिकेच्या उपनगराध्यक्षपदी रमेश चव्हाण यांची निवड



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरूम पालिकेची पहिली विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवारी (ता. ९) रोजी पालिकेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपनगराध्यक्षपदी रमेश चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मुरूम पालिकेत भारतीय जनता पक्षाने बहुमत प्राप्त केले असून नगराध्यक्षपदी बापुराव पाटील हे विजयी झाले आहेत. उपनगराध्यक्ष निवडीसाठी शुक्रवारी (ता. ९) रोजी नवनिर्वाचित नगराध्यक्ष बापूराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत पालिकेच्या उपनगराध्यक्ष यांची निवड करण्यात आली. उपनगराध्यक्ष पदासाठी रमेश चव्हाण यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने पीठासीन अधिकारी तथा पालिकेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांनी रमेश चव्हाण यांची उपाध्यक्ष पदासाठी बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी स्वीकृत नगरसेवकपदी सूर्यकांत जाधव व श्रीराम कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. या निवडीनंतर नवनिर्वाचित नगराध्यक्ष बापूराव पाटील, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण यांचा भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, युवा नेते मल्हार पाटील, नितीन काळे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी युवानेते शरण पाटील, माजी सभापती मदन पाटील, उमरगा जनता बँकेचे संचालक रफिक तांबोळी, योगेश राठोड, दत्ता चटगे, गटनेते गणेश अंबर, नगरसेवक गौस शेख, रुपचंद गायकवाड आदींसह नगरसेवक, भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


## जे दिसते ती श्रद्धा अन् जे दिसत नाही ती अंधश्रद्धा - प्रा. डॉ. महेश मोटे




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या तालुक्यातील मौजे कदेर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय शिबिरात आज चौथ्या दिवशी बौद्धिक व्याख्यानात "श्रद्धा आणि अंधश्रद्धा " या विषयावर प्रा.डॉ.महेश मोटे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.डी.पी.चव्हाण, प्रा,डॉ. उमाकांत सूर्यवंशी, प्रा. गायकवाड, प्रा.अजिंक्य राठोड कार्यक्रम अधिकारी,डॉ.भाऊसाहेब उगले हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीस संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सकाळपासून मौजे कदेर येथे केलेल्या गावातील स्वच्छता कामाची माहिती देऊन शिबिरार्थी विद्यार्थी समर्थ कुंभार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.त्यात लोकमान्य टिळक विद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोरील गवत ,अनावश्यक झाडे काढणे,रस्ते झाडून साफ करणे,झाडाना संगोपीत करणे,सांडपाण्याची दिशा दूरपर्यंत घेऊन जाणे,राष्ट्रभक्तीपर गायन करणे, आदी कामे केल्याचे व दिवसभर करावयाच्या कामाची यादी वाचून दाखवली.त्यानंतर प्रत्यक्ष कार्यक्रमास सुरुवात झाली.प्रा.डॉ.महेश मोटे यांनी अतिशय सविस्तरपणे श्रद्धा व अंधश्रद्धा यातील फरक विद्यार्थ्यांना समजून सांगितला.आज घडीला युवकांचे मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे.नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे.स्पर्धात्मकता प्रचंड वाढली आहे.सर्वदूर तणावग्रस्त जीवन दिसत आहे.गुणात्मक व दर्जेदार शिक्षणाची वानवा आहे या सगळ्या पार्श्वभूमीवर पुन्हा जीवनात आमूलाग्र बदलाचे साधन म्हणून आपल्याला शिक्षणाकडेच बघावे लागते हे वास्तव आहे.खरे तर हा अत्यंत नाजूक विषय अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात हाताळत प्रा.डॉ.महेश मोटे यांनी युवकासमोरील आव्हाने व श्रद्धा , अंधश्रध्दा याविषयीचे आपले आणि विचारधारा प्रतिपादन केली. आज नोकऱ्या नाहीत. बेकारी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. तरुण युवक नैराशेने ग्रासून गेला आहे. अशा प्रतिकूल अवस्थेत विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार केला पाहिजे. शिक्षणामुळे माणूस समृद्ध बनतो. प्रगतिशील बनतो, त्याचे जीवनमान सुधारते. चांगले व वाईट आपल्याला ओळखता आले पाहिजे. आपले व्यक्तिमत्व अष्टपैलू असले पाहिजे. नुसते शिवाजी महाराज यांचे नांव जरी आपण काढले तर त्यांची प्रतिमा आपल्या समोर उभी राहते. त्याचे कारण म्हणजे त्यांचे कार्य आणि कर्तृत्व होय. उगीचच कुणाचीही जयंती आणि पुण्यतिथी साजरी होत नाही. तर त्यांच्या आयुष्यात त्यांनी त्यांच्या परीने अजोड कामगिरी केलेली आहे. निकोप समाजव्यवस्थेसाठी आपण वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगला पाहिजे. बुद्धीवर आणि तर्कावर पोसलेला समाजच प्रगतीपथावर मार्गक्रमण करू शकतो. आपला महाराष्ट्र हा शिव, फुले, शाहू , आंबेडकर यांच्या नावाने ओळखला जातो. आपण पुरोगामी महाराष्ट्रात अधिवास करतो. त्यामुळे श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील तफावत आपण नीटपणे समजून घेतली पाहिजे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात अत्यंत पुसट अशी सीमारेषा असते. श्रद्धेतून आपण कधी अंधश्रद्धा पाळतो हे आपल्याला कळतही नाही. आपण वैज्ञानिक दृष्टिकोनातून तर्कचिकित्सा केली पाहिजे. जे तर्कावर, ज्ञानावर, विवेकी बुद्धीवर घासून पुसून पहिले तरी सिद्ध होत नाही ती अंधश्रद्धाच आहे,अंगात येणे ही अंधश्रद्धाच आहे.तसा हा विषय अतिशय गहन असून मी मोजक्या घटना प्रसंगातून आपल्याला अंधश्रद्धा व श्रद्धा या कशा वेगळ्या आहेत हे समजाऊन सांगण्याचा प्रयत्न केला आहे.डॉ.महेश मोटे यांच्या या बौद्धिक व्याख्यानास विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. अनेक प्रश्न विचारूनं विद्यार्थ्यांना बोलते केले.विद्यार्थ्यांच्या आग्रहास्तव मोबाईल चे वाढते व्यसन चांगले की वाईट यावरही महेश मोटे यांनी प्रकाश टाकला.."श्रद्धा आणि अंधश्रद्धा " या व्याख्यानाचे अध्यक्ष प्रा. डॉ. डी.पी.चव्हाण यांनीही विद्यार्थ्यांनी "श्रद्धा व अंधश्रद्धा" समजून घेऊन समाजातील अंधश्रद्धा दूर करण्याच्या प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवला पाहिजे असे सांगितले.डॉ.महेश मोटे गेल्या बारा वर्षापासून अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अनिस)काम करत आहेत.राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्दिष्टांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन हा विषय कायम ठेवला जातो त्याचे कारण म्हणजे आजचा युवक हा अंधश्रद्धा मुक्त असला पाहिजे.आजची तरुण पिढी ही व्यसनाच्या आहारी न जाता ,एका सदृढ समाज निर्मितीसाठी जाणीवजागृती करणे अत्यंत गरजेचे असते ही जवाबदारी तुमच्यावर आहे त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना ही आवाहन आहे की या संकल्पात आपले भरभरून आपले योगदान द्या,असे आवर्जून सांगितले आणि डॉ.डी.पी.चव्हाण यांनी अध्यक्षीय समारोप केला.दुपारच्या जेवणानंतर दोन तीस वाजता "श्रद्धा आणि अंधश्रद्धा " या बौद्धिक व्याख्यानास सुरुवात झाली.या कार्यक्रमाचे नेतृत्व व सूत्रसंचालन शिबिरातील विद्यार्थिनी प्रतिनिधी कू. गायत्री पालवे हिने केले तर कार्यक्रमाचे आभार कु.साक्षी रेवते हिने व्यक्त केले.या कार्यक्रमास गावातील बहुसंख्य गावकरी , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पसायदानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० जानेवारी २०२६


## लोककलांचे संवर्धन करणे महत्त्वाचे - कल्याण उगले




**जालना :** लोककला ह्या समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे. लोककला समाजाचा चिरंतन वारसा आहे. ज्ञान मनोरंजनाबरोबरच समाजप्रबोधनही झाले पाहिजे. समाज माध्यमांमध्ये कितीही बदल झाले असले तरी लोककलांचा वारसा आपण जतन करून ठेवला पाहिजे. म्हणून प्रत्येकाने लहानपणापासूनच कोणत्या तरी कलेचा छंद जोपासला पाहिजे तो वृद्धिंगत केला पाहिजे. लोककलेच्या माध्यमातून समाजातील ताण तणाव त्याचबरोबर आनंद द्विगुणित करण्याचे कार्यही होते. प्रत्येकाने कोणती ना कोणती तरी लोककला अवगत करावी.असे प्रतिपादन शाहीर कल्याण उगले यांनी केले. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात ते सायंकाळच्या सांस्कृतिक उपक्रमात "महाराष्ट्राची लोककला" सादर करत होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील विविध लोककलांचे प्रकार सादर केले. गवळण, पोवाडा, अभंग, वासुदेव, झगडा, भारुड, पोतराज यासारखे कलाप्रकार सादर करून उत्तम प्रकारे सादरीकरण करून उपस्थितांचे मनोरंजन केले. लोककला म्हणजे सामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनातून, त्यांच्या परंपरा, श्रद्धा आणि संस्कृतीतून निर्माण झालेली कला. ही कला कोणत्याही औपचारिक प्रशिक्षणाशिवाय, पिढ्यानपिढ्या चालत आलेली असते आणि त्यात गाणी, नृत्य, कथाकथन (उदा. भारूड, तमाशा, पोवाडे, गोंधळ यांसारख्या अनेक प्रकारांचा समावेश होतो, जे स्थानिक आणि सामुदायिक जीवनाचे प्रतिबिंब दाखवतात. या सर्व कलाप्रकाराचे सादरीकरण शाहीर कल्याण उगले आणि त्यांच्या संचाने सादर करून उपस्थितांमध्ये नवा उत्साह निर्माण केला.या लोककला सादरीकरणात माधवी माळी यांनी भारुड, लोकगीत सादरीकरणात सोहेब शेख यांनी गण गवळण पोवाडा, वाघ्या मुरळी, आनंद घुले यांनी पोतराज भारुड सादर केले.यावेळी सहकलाकार आदित्य दुसाने, आर्या वीर, अर्जुन धुमाळ, सुमेध वाहूळे, ज्ञानेश उगले, विशाल उगले, प्रतीक साळुंके यांनीही आपली कला ताकदीने सादर केली तसेच मार्गदर्शक म्हणून प्रा. कल्याण उगले यांनी सहभाग घेऊन ढोलकी वाजवून उत्तम प्रतिसाद दिला. संबळचे वादन श्री. विशाल उगले यांनी केले तर हार्मोनियमवर साथ प्रतीक साळुंके, आदित्य मुदिराज यांनी दिली. यावेळी सर्व कलाकारांनी आपली कला सादर करत लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धनाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले.माधवी माळी आणि आनंद घुले..भारुड एकनाथांचे सादर केले तर आदित्य मुदिराज यांनी अभंग सादर केला. अभंगातून त्यांनी व्यक्तीमध्ये असलेल्या मोह, माया, मत्सर इत्यादी दुर्गुण हे कसे दूर करावे हे सांगितले. सदाचार कसा करावा, सद्गुणाची भक्ती कशी करावी हेही सांगितले. अभंगाला वर्तमान मनोरंजनाचा आधार घेत विडंबनात्मक अशा पद्धतीने त्यांनी समाजातील विकृतीवर बोट ठेवले. मानवी मनातील विकृती जोपर्यंत नष्ट होणार नाही तोपर्यंत आदर्श समाज निर्माण होणार नाही हे त्यांनी स्पष्ट केले. मा जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि तानाजी मालुसरे यांचा जीवनावरील पोवाड्याचे सादरीकरण करून त्यांनी उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण केला. यावेळी प्रा.प्रियदर्शन भवरे, प्रा. संभाजी कांबळे, प्रा.माधव हेबाडे यांच्यासह कार्यक्रमाधिकारी प्रा. उद्धव थोरवे, प्रा. अभिजीत भुतेकर यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी आणि बहुसंख्येने गावातील नागरिक उपस्थित होते.

## दशसूत्री उपक्रमातून विद्यार्थी गिरवतायेत स्वावलंबनाचे धडे



**कन्नड (अरुण थोरात) :** दशसूत्री उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, आरोग्यजागरूकता तसेच जीवनोपयोगी कौशल्यांचा विकास घडवण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवीनवसाहत, केंद्र. वासडी, ता. कन्नड येथे एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाळेतील परसबागेत पिकवलेल्या पालक, कोथिंबीर, मेथी, लसूणपात, कांदे तसेच मिश्र धान्याच्या पिठाचा वापर करून विद्यार्थ्यांनी पौष्टिक थालीपीठ तयार केले.शाळेतील परसबागेत विविध भाज्यांची लागवड विद्यार्थी व शिक्षकांच्या सहभागातून करण्यात आली होती. भाज्या तयार झाल्यानंतर शालेय पोषण आहार शिजवणाऱ्या सेविका सुनीता नाना बनकर, शाळेतील शिक्षिका श्रीमती किरण सोमदे तसेच मुख्याध्यापिका अपर्णा धाटबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी भाज्या स्वच्छ करून त्यांचा उपयोग थालीपीठ तयार करण्यासाठी केला.या वेळी विद्यार्थ्यांना धान्य, भाज्या व मसाल्यांचे पोषणमूल्य समजावून सांगत स्वयंपाक प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग देण्यात आला. विद्यार्थ्यांनी गटामध्ये काम करत एकमेकांना मदत केली, त्यामुळे त्यांच्यामध्ये 'सहकार्याची भावना' अधिक दृढ झाली.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना स्वयंपाककला, स्वच्छता, वेळेचे नियोजन तसेच उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर यांचे प्रत्यक्ष अनुभव मिळाले. 'परसबाग ते ताट' ही संकल्पना विद्यार्थ्यांना प्रभावीपणे समजली आणि स्वावलंबनाचा संदेश ठळकपणे पोहोचला. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पौष्टिक थालीपीठाचा आस्वाद घेत आनंद व्यक्त केला.एकूणच दशसूत्री उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरला असून, शालेय शिक्षणाला प्रत्यक्ष जीवनाशी जोडणारा एक आदर्श उपक्रम म्हणून त्याची नोंद घेण्यात आली.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० जानेवारी २०२६

# विज्ञान आणि अध्यात्म यांच्या समन्वयातुनच समाजाचा सर्वोत्कर्ष शक्य - श्री प्रकाश प्रभुणे




**जालना :** व्यक्ती, समाज, राष्ट्र असो की संपूर्ण विश्व यांच्या विकासाकरिता विज्ञानाची निश्चितच गरज आहे परंतु यासोबतच अध्यात्मालाही विसरून चालणार नाही. विज्ञान आणि अध्यात्म यांचा सुंदर समन्वय म्हणजेच सर्वोत्कर्षाचे सूत्र होय. ज्या ठिकाणी विज्ञान उणे अध्यात्म असते त्या ठिकाणी सर्वनाश ठरलेलाच असतो म्हणूनच विज्ञानासोबत अध्यात्माची सांगड घालणे ही काळाची गरज आहे तेव्हाच एक सुदृढ, सुसंस्कृत आणि सर्वसमावेशक समाजाची निर्मिती होऊ शकेल असे मत हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड चे सेवानिवृत्त अभियंता श्री प्रकाश भास्कर प्रभुणे यांनी व्यक्त केले. ते येथील जे.ई.एस. महाविद्यालयाच्या पदवीदान समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांकडे केवळ बुद्धिमत्ताच असून चालत नाही तर बुद्धिमत्ते सोबतच संतुलित मन आणि सकारात्मक विचारांची ही गरज असते. सकारात्मक विचाराने माणसांमध्ये विवेक जागृत होतो. विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये जगत असताना नेहमी समाज भान राखले पाहिजे. समाजाकडून आपण जे काही प्राप्त केले आहे ते समाजास परत देण्याची मानसिकता बाळगली तरच समाज सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने वाटचाल करेल. विद्यार्थ्यांनी नेहमी वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून संस्कार आणि मूल्यांचे जतन करावे जेणेकरून समाजामध्ये संस्कार व संस्कृती विकसित होईल. आज विज्ञानासोबत अध्यात्म या दृष्टीने संशोधनास खूप मोठा वाव असून विज्ञानाधारित अध्यात्म आणि अध्यात्म आधारित विज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून यांचे समाजभान ठेवून विश्लेषण आणि संशोधन होणे ही काळाची गरज आहे. कुठलेही संशोध एकांगी, एकतर्फी व्हायला नको आहे जेणेकरून सर्वंकष विचार करण्याची प्रवृत्ती लोप पावेल असे मत आपल्या अध्यक्षीय समारोपामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या वेळी ते म्हणाले की पदवी म्हणजे आपणास मिळणारा केवळ कागदाचा एक तुकडा नसून यामध्ये आपली परिश्रम आणि निष्ठा दडलेली आहे. तसेच या पाठीमागे काही मूल्य आणि संस्कार ही आहेत जे आपणास महाविद्यालयाने आणि विद्यापीठाने दिलेले आहेत याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवून आपल्या ज्ञानाचा उपयोग समाज व राष्ट्रहितासाठी करावा. एकदा पदवी मिळाली म्हणजे शिक्षण संपले असे नव्हे तर शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून विद्यार्थ्यांनी आणखी पुढे शिकत जावे आणि जास्तीत जास्त ज्ञान संपादित करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात एनसीसी विभागाचे कॅप्टन डॉ. फुलचंद मोहिते यांच्या नेतृत्वाखाली शोभा यात्रेने करण्यात आली. या कार्यक्रमाकरिता सर्वश्री प्रकाश कुलकर्णी, दिनकर नाकाडे, सतीश कुलकर्णी, किरण कुलकर्णी, दत्तात्रय करजगीकर, सुहास जोशी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. नानासाहेब गोरे यांनी केले, पाहुण्यांचा परिचय डॉ. गणेश रोकडे यांनी करून दिला तर आभार या कार्यक्रमाचे संयोजक डॉ. सूर्यकांत चौगुले यांनी व्यक्त केले. डॉ. गणेश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना पदव्या वितरित केल्या. यावेळी विविध विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हरवलेले दिवस

हरवले दिस आता
मनामधी आठवण
गप्पाटप्पा अंगणात
जागेपणी हे सपन

दिस सोनेरी चंदेरी
वेळ निवांत न् छान
भोळ्या भाबड्या पिढीच्या
मनी नाही अभिमान

साधी भोळी ती माणसं
साधं भोळंच जगणं
माणसाचं माणसाशी
माणुसकीनं वागणं.
सुख दु:खाच्या समयी
गाव एक होई सारं
नाही खेटलंय त्याला
भेदभावाचं रे वारं

अशी नव्हती माणसं
पैशामागी धावणारी
जरी उन्हात तळली
त्यांची जिंदगाणी सारी

येता यंत्रयुग नवं
माणसाचं यंत्र झालं
चार भिंतीच्या जगात
जीणं हरवून गेलं



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १० जानेवारी २०२६


# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात कालिकादेवी विद्यालय सर्वप्रथम




**शिरूर कासार (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूर, आणि जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग बीडच्या वतीने छत्रपती संभाजी राजे ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, अंबाजोगाई येथे आयोजित '५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन' दि.०६ जानेवारी ते ०८ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न झाले. विकसित व आत्मनिर्भर भारतासाठी (STEM) या मुख्य विषयावरील जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जिल्ह्याच्या सर्व तालुक्यातील विजेते बालवैज्ञानिक व शिक्षक यांनी आपल्या नाविन्यपूर्ण कल्पक प्रतिकृती प्रदर्शित केल्या होत्या.यामध्ये शिरूर (का.) जि. बीड येथील कालिकादेवी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनामुळे विद्यालयाने ५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदवला होता. माध्यमिक गटातून विद्यालयाचा विद्यार्थी चिं. शोएब शौकत आतार या विद्यार्थ्याने, "बहुउद्देशीय सौर रस्ता क्लीनर" म्हणजेच सौर उर्जेवर चालणारे एक आधुनिक उपकरण बनवून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सादर केले होते.या वैविध्यपूर्ण व बहुउद्देशीय यंत्राचे तसेच या नव्या संकल्पनेचे परीक्षकांनी कौतुक केले. अशा या आधुनिक उपकरणाच्या नाविन्यतेमुळेच कालिकादेवी विद्यालयाला, जिल्ह्यातून 'प्रथम क्रमांक' मिळाला आहे. विज्ञान प्रदर्शनाच्या ठिकाणीच मान्यवरांच्या हस्ते, चि. शोयब आतार व विज्ञान शिक्षक प्रा. सुनील मोरे यांना प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देऊन त्यांचा व विद्यालयाचा गौरव करण्यात आला. यानंतर विभागीय स्तरावर भरणाऱ्या विज्ञान प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी बीड जिल्ह्यातून कालिकादेवी विद्यालयाला मान मिळाला आहे. यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब, मा. रोहित (भैया) क्षीरसागर, प्रशासकीय अधिकारी डॉ. राजु मचाले साहेब, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी श्री योगेश पवार साहेब,मा.एम.ए.राऊत सर, प्राचार्य केशव भांगे साहेब, उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, उपमुख्याद्यापक प्रकाश राठोड, पर्यवेक्षक जनार्दन काळे व सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थी यांनी विद्यालयाचे व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

# जिल्हा परिषद प्रशाला बहिरगावचा चित्रकला परीक्षेचा शंभर टक्के निकाल

**कन्नड (प्रतिनिधी) :** जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव ता-कन्नड शाळेने शासकीय रेखा कला परीक्षा इलेमेंटरी व इंटरमिजिएट ड्राइंग ग्रेड परीक्षा सन २०२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या शंभर टक्के निकालाची यशस्वी परंपरा यंदाही कायम राखली आहे. या परीक्षेत इलेमेंटरीसाठी २४ व इंटरमिजिएटसाठी २५ असे एकूण ४९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते आणि सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाळेचा निकाल शंभर टक्के लागला.इलेमेंटरी ड्रांइग ग्रेड परीक्षेत ए ग्रेड मिळवून यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य सुनील दापके, हर्षाली योगेश जाधव, कल्याणी एकनाथ जाधव, खुशी अनिल मोरे, पूजा गणेश खराते, साधना शंकर शिरसे, सुकन्या आनंद दापके, शिवप्रसाद सुरेश सुराशे व अनुजा भारत बनकर यांचा समावेश आहे. तसेच इंटरमिजिएट ड्रांइग ग्रेड परीक्षेत अमृता कैलास बनकर, आरुषी कैलास पगार, कल्याणी दिलीप वाघ, कविता रमेश मराठे, रुद्र प्रवीण जाधव, शिवानी सतीश आदिक, सिद्धी प्रवीण जाधव, सुहानी दशरथ मुळे, तन्वी गणेश शेजवळ, तन्वी राहुल शेजवळ, तेजल दीपक बच्छाव, वैभव भाऊसाहेब उगले व वैष्णवी गणेश बनकर यांनी ए ग्रेड मिळवून घवघवीत यश संपादन केले.या सर्व विद्यार्थ्यांच्या यशामागे शाळेचे कलाशिक्षक सलीम आत्तार यांचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण मेहनत व विद्यार्थ्यांची कलात्मक जिद्द महत्त्वाची ठरली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रशालेच्या प्रभारी मुख्याध्यापिका नूतन पवार तसेच शिक्षक दिलीप महाजन, कुलभूषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, सलीम आतार ,श्याम खोसरे, श्रीमती किरण पाटील, राधेशाम शर्मा ,स्वप्निल गांगुर्डे, गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, किसनाबाई गोरे आणि सविता कुंटे विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील उज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या आहेत

# पोशिंदा

मी जगाचा पोशिंदा, असे प्रत्येकजण म्हणतो।
खरचं पोशिंदा आहे का मी, मला प्रश्न पडतो।।
मी राब-राब राबतो, धान्य पिकवतो।
इतरांना धान्याचा पुरवठा करतो।
अन् घरात मात्र माझ्या, धान्याचा कण सुद्धा नसतो।।
खरचं पोशिंदा आहे का मी..
जय किसान चा नारा, प्रत्येक व्यक्ती देतो।
धान्यामाला मात्र माझ्या, कवडीमोल भाव असतो।
पाणी - पाणी करुन जीव माझा जातो।।
खरचं पोशिंदा आहे का मी....
काय सांगु, किती सांग, तुम्हा माझी दैना।
दोन चार हजारासाठी, वायरमन लाईटही देईना।
मग अंधारलेल्या घरामध्ये आम्ही तसेच राहतो।।
खरचं पोशिंदा आहे का मी ...
चोरी - लबाडी करीत नाही, तरी माझी दैना।
अन् शासन माझ्या धान्याला, हमीभावही देईना।
मुलांना शिवकवून मोठं करावं, स्वप्न हे पाहतो।।
खरचं पोशिंदा आहे का मी...
तीस-चाळीस हजार, बँकेचे कर्ज मिळते।
सततच्या दुष्काळानं कर्ज वाढत जाते।
कर्ज वसूलीसाठी बँक मॅनेजर घरावर ताबा मिळवतो।।
खरचं पोशिंदा आहे का मी...
घर जाते, जमीन जाते, संसार सारा उघड्यावर येतो।
शासन मात्र निमुटपणे बघ्याची भुमिका घेतो।
लेकरांची ही तारांबळ पाहुन, ऋदयाचा ठोकाच बंद होतो।।
खरचं पोशिंदा आहे का मी मला प्रश्न पडतो?
खरचं पोशिंदा आहे का मी मला प्रश्न पडतो?



कवी
**क्रांतीपाल सिरसाट**
सामाजिक कार्यकर्ता
मो. ९३२५६४४१८२

# युक्ती

हरणाचे एक पाडस
फिरत होते जंगलात
लुसलुशीत गवत खावे
आले त्याच्या मनात

अचानक त्याच्या समोर
एक वाघोबा आले
घाबरलेले पाडस
भयभीत झाले

जिभल्या चाटीत वाघोबा म्हणे
ईथे नाही कुणी
बऱ्याच दिवसांनी
मस्त होणार मेजवानी

युक्ती लढवित पाडस म्हणे
तुम्ही खुशाल खा मला
पण एका मेजवानीसाठी
मुकसाल जीवाला

वाघोबा पडले बुचकळ्यात
काहीच सुचेना त्याला
घाबरत घाबरत म्हणाले
स्पष्ट सांग मला

माझ्या मागावर आहे
शिकाऱ्यांची टोळी
धावत धावत आलो
चुकवून बंदुकीची गोळी

वाघोबाला वाटले
शिकार होणार आपली
विचार न करता
तिथून धूम ठोकली



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५६९१०६


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**

**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002